विशेष दिवाणी दावा क्र. ५९ / २०१४

दत्तात्रय नायगुडे वगैरे

वि.

मच्छींद्र नायगुडे वगैरे

## आदेश निशाणी क्र. ८५ आणि १ वर

1. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी मुदतीत कैफियत दिलेली नाही. प्रतिवादी हे आजारी असल्यामुळे त्यांना कैफियत देता आली नाही. त्यामुळे आता त्यांची कैफियत स्वीकारण्यात यावी यासाठी प्रस्तुत अर्ज देण्यात आलेला आहे.

2. त्यावर वादी यांचे वकील श्री. एम. बी. गाजरे यांनी तीव्र आक्षेप नोंदवलेला आहे. मुदतीत कैफियत न देण्यासाठी योग्य कारण अर्जामध्ये नमुद केलेले नाही त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा. जर प्रतिवादी यांना संधी दिली तर वादी यांना कॉस्ट मिळावे असे त्यांनी नमूद केले आहे.

3. वादी यांचे वकील श्री कोष्ठी यांनी असे सांगितले की, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी निशाणी क्र. ५ चे अर्जावर त्यांचे म्हणणे निशाणी क्र. १७ प्रमाणे दि. २४/११/२०१४ रोजी दिलेले आहे. त्यामुळे कैफियत दिली असावी अशा शक्यतेने आज रोजी पर्यंत कैफियत देता आली नाही. प्रस्तुत अर्जासोबत प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्यांची स्वतंत्र कैफियत दाखल केली आहे.

4. वादी व प्रतिवादी हे एकाच कुटूंबातील घटक आहेत. त्यांचेतील वाद विषय कायमस्वरुपी व गुणदोषावर संपुष्टात येण्यासाठी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांची कैफियत स्वीकारुन त्यांना बाजू मांडण्याची संधी देणे न्यायाचे दृष्टीने योग्य राहील. परंतु प्रस्तुत दाव्यामध्ये वादी यांनी त्यांचे सरतपासणीचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. सुमारे ४ वर्षापेक्षा जास्त कालावधी पासून प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्यांची कैफियत दिलेली नाही. त्यामुळे प्रतिवादी

यांना कॉस्ट करण्याचा आदेश देणे योग्य राहील. त्यासाठी, मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आ दे श</u>**

1. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

2. आज रोजीच प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादी यांना रक्कम रु. ५००/- कॉस्ट दिल्यानंतर प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे कैफियत शिवाय पुढे चालवण्याचा झालेला आदेश रद्द करण्यात येत आहे.

3. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दिलेली कैफियत स्वीकारण्यात येत आहे.

दिनांक : १९/०९/२०१९

( श्रीकृष्ण हरिभाऊ इनामदार )
२ रे सहदिवाणी न्यायाधीश व. स्तर, पंढरपूर.

# <u>C E R T I F I C A T E</u>

I affirm that the contents of this PDF file Judgment/ Order is same word to word as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| a | Name of the Stenographer | : P. N. Kanaki. |
| b | Court | : 2nd Jt. C.J.S.D.& A.C.J.M, Pandharpur. |
| c | Date of Order | : 19/09/2019 |
| d | Order signed by P.O. on | : 19/09/2019 |
| e | Order uploaded on | : 20/09/2019 |